# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ३० जून, २०२५ / आषाढ ९, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

---

### भोर (जि.पुणे) तालुक्यातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१) * १०७८८ श्री.शंकर मांडेकर (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील कापूरहोळ-भोर मांढरदेवी मार्ग तसेच शिंदेवाडी-भोर-वरंधा-महाड हे दोन्ही रस्ते डोंगराळ भागातील असून नागरिकांसाठी अत्यंत महत्वाचे असल्याने शासनाने त्यास निधी उपलब्ध करुन दिला असतानाही रस्त्याची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत दोन्ही रस्त्यांची झालेली कामे ही निकृष्ट दर्जाची झाल्याने तेथे वारंवार अपघात होऊन नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण होत असल्याने स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी वारंवार लेखी तक्रार करुनही कामाच्या दर्जात सुधारणा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदारांविरुध्द कारवाई करण्यासह सदर रस्त्यांची दुरुस्ती व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) सदर रस्त्यांची कामे सद्य:स्थितीत प्रगतीत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

(३) भोर तालुक्यातील कापूरहोळ-भोर-मांढरदेवी या राज्य महामार्ग वरील काम ८२% पूर्ण झाले असून, उर्वरित ४.२ कि.मी. लांबीसाठी वन विभागाची आवश्यक परवानगी प्राप्त करून काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. शिंदेवाडी-भोर-वरंधा-महाड या राष्ट्रीय महामार्ग वरील २१.२०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित, ४०० मीटर लांबीपैकी, सावित्री नदीवरील पुलाचे २०० मीटर लांबीतील काम प्रगतीत असून, उर्वरित २०० मीटर चे काम वन विभागाची आवश्यक परवानगी प्राप्त करून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील रस्ते काँक्रीटीकरणाच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२) * ७९६१ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.आदित्य ठाकरे (वरळी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून मुंबई परिसरात केल्या जात असलेल्या ६ हजार कोटी रुपयांच्या रस्ते काँक्रीटीकरण कामामध्ये कोट्यवधी रुपयांची अनियमितता झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ २८ टक्के रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाले असून ९८९ रस्त्यांचे काम अंतिम टप्प्यात असून ३९० रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाले आहे तर ७२८ रस्त्यांची कामे पावसाळ्यानंतर होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील रस्त्यांची कामे विहित मानकानुसार झाली नसल्याने तसेच रस्त्यांचा दर्जा व गुणवत्तेबाबत दुर्लक्ष केल्याने अल्पावधीतच रस्त्यांना भेगा पडून दुरुस्ती करण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) एकूण २१२१ रस्त्यांपैकी ७७१ रस्त्यांचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले आहे व ६१४ रस्त्यांचे एका संगम स्थानापासून दुसऱ्या संगम स्थानापर्यंतचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित रस्त्यांची कामे पावसाळ्यानंतर सुरु करण्यात येत आहे.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

जून, २०२४ पूर्वी पूर्ण केलेल्या काही कामांमध्ये काँक्रिट पृष्ठभागावर तडे पडल्याचे आढळल्याने कंत्राटातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे. तडे गेलेले पॅनल कंत्राटदाराकडून विनामुल्य नव्याने तयार करून घेण्यात आले आहेत व कंत्राटदारास दंड ठोठावण्यात आला आहे. रस्त्यांची कामे विहित मानकांनुसार होण्यासाठी देखरेखीसाठी गुणवत्ता व्यवस्थापन संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. गुणवत्ता राखण्यासाठी अधिक मार्गदर्शनाकरीता महानगरपालिकेतर्फे आय.आय.टी. मुंबई या नामांकित तांत्रिकी संस्थेची दि.११ सप्टेंबर, २०२४ रोजी नियुक्ती करण्यात आली असून याबाबत त्यांच्याकडून देखरेख व मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने महानगरपालिकेला मिळकत कर भरला नसल्याबाबत**

**(३) * १०११८ श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पुणे महानगरपालिकेचा २७ कोटी रुपयांचा मिळकत कर सन २०१९ पासून भरलेला नसल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १० लाख रुपयांची अनामत रक्कम भरली नाही म्हणून एका गर्भवती महिलेवर उपचार करणे नाकारून तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने महानगरपालिकेचा कर थकविला असतानाही रुग्णालयावर महानगरपालिकेने कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर वसुलीसह रुग्णालय आणि याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर मिळकत धारकास वेळोवेळी नोटीस व जप्तीचे वॉरंट बजावण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ४१ नुसार थकीत रक्कमेवर २ % शास्तीची कारवाई करण्यात येत आहे.
(३) सदर मिळकतीच्या थकबाकीबाबत मिळकतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम ४२ चे तरतुदीनुसार सदर मिळकत धारकास महानगरपालिकेकडून वेळोवेळी नोटीस व जप्तीचे वॉरंट बजावण्यात आले आहेत. सदर मिळकत ही रुग्णालय असल्याने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून मिळकत सीलिंग करणे अडचणीचे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर (जि.नागपूर) एमआयडीसी येथील एका गोडाऊन मध्ये बासमती तांदळाचा सुगंध येण्यासाठी केमिकल लावले जात असल्याबाबत

**(४) * ८४२० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (जि.नागपूर) एमआयडीसी येथील गोडाऊनमध्ये बासमती तांदळाला सुगंध येण्यासाठी केमिकल लावले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केमिकलयुक्त तांदूळ विविध ठिकाणच्या बाजारात वितरित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गैरप्रकार भविष्यात घडू नयेत याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) सदर घटना नागपूर येथील नसून अहिल्यानगर जिल्ह्यातीत नागापूर एमआयडीसी येथील आहे. अन्न व औषध प्रशासनाने दि.२५.०४.२०२५ रोजी मे. खुशी इंडस्ट्रिज, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर या आस्थापनेची तपासणी केली असता तपासणीवेळी सदर आस्थापनेमध्ये तांदळाला सुंगधीत करण्यासाठी वापरात येणारा सुंगधीत पावडरचा अर्धवट वापर झालेला डबा आढळून आल्यामुळे सदर आस्थापनेतून फुड ग्रेन राईस व बासमती राईस (रॉयल खुशी गोल्ड) या दोन अन्न पदार्थाचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येवून उर्वरित साठा जप्त केला आहे.
(२) सदर जप्त केलेला तांदूळ या अन्न पदार्थाचा साठा विविध ठिकाणच्या बाजारात वितरित करण्यात आला नाही.
(३) व (४) सदर आस्थापनेतून विश्लेषणाकरीता घेण्यात आलेल्या फुड ग्रेन राईस व बासमती राईस (रॉयल खुशी गोल्ड) या दोन्ही अन्न नमुन्यांचा विश्लेषण अहवाल राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांनी प्रमाणित असल्याचे घोषित केलेले आहेत. सदर नमुन्यांपैकी बासमती राईस (रॉयल खुशी गोल्ड) तांदुळास सुंगधित पावडर प्रक्रिया केलेली असल्याचे संशय असल्याने सदर नमुन्याचा भाग फेरविश्लेषणासाठी रेफरल प्रयोगशाळा, म्हैसुर येथे पाठविण्यात आला आहे.

सदर आस्थापनेचे मालक/अन्न व्यावसायिक यांनी त्यांच्या आस्थापनेत तांदळास सुंगधित करण्यासाठी सुंगधित पावडर आढळून आल्यामुळे त्यांच्याविरूद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील कलम ५७ (Penalty for possessing adulterant) नुसार कारवाई प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर शहरातील बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत दुषित पाण्यामुळे दोन मुलींचा झालेला मृत्यु**

**(५) * ९०५२ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत सलग दुस-या दिवशी दुषित आणि मैलामिश्रीत पाण्यामुळे दोन शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात परिसरातील नागरिकांनी मृतदेह रस्त्यावर ठेवून महानगरपालिका प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन सदर परिसरात शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, चौकशीनुसार मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यासह यास जबाबदार असलेल्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील बाबू जगजीवनराम झोपडपट्टीमधील मोदी शिवाजीनगर भागात दोन शाळकरी मुलींचा अचानक जुलाब, उलटी होऊन दिनांक ०४-०४-२०२५ व दिनांक ०५-०४-२०२५ रोजी मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, प्राप्त शवविच्छेदन अहवालानुसार सदरचा मृत्यू जलजन्य जिवाणूमुळे झालेला नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर दुर्घटना घडण्यापूर्वी या भागामध्ये घाणपाणी अथवा दुषित पाणी येत असल्याबाबत त्या परिसरातील नागरिकांनी तक्रारी केल्या नसल्याचे सोलापूर महानगरपालिकेला त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेखावरुन आढळून आले. तसेच प्रस्तुत घटना घडल्यानंतर दि.०५/०४/२०२५ रोजी नागरीकांच्या घरातील पाण्याची ओटी टेस्ट (OT- Orthotolidine test) घेण्यात आली असून त्यानुसार पाणी पिण्यास योग्य असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदर झोपडपट्टी समोरील मुख्य रस्त्यावर ३०० मिमी व्यासाची नविन ड्रेनेज लाईन घालण्यात आलेली आहे. याच बरोबर अस्तित्वातील सर्व ड्रेनेज मॅनहोल मधील गाळ काढून मॅनहोलही साफ केलेले आहेत व आवश्यकतेनुसार देखभाल दुरुस्तीचे कामे करण्यात आलेले आहे. तसेच जलवितरण नलिकाचे वॉशआऊट करुन स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी-जिंतूर या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(६) * ७९०५ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी-जिंतूर येथे कोट्यवधी रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यावर वर्षभरातच अनेक ठिकाणी भेगा पडल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची देखभाल व दुरुस्ती किमान १० वर्षे करण्याचे दायित्व संबंधित ठेकेदाराचे असतानाही रस्त्याची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकारांकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच यातील दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) परभणी- जिंतूर हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग असून केंद्र शासनाची स्टेट एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यामार्फत रस्त्याचे काम करण्यात येत आहे. सदर रस्त्याच्या लांबीमध्ये काही ठिकाणी भेगा पडलेल्या आहेत, ही वस्तूस्थिती आहे.

(२) सदर कामाच्या करारनाम्यातील तरतुदीनुसार रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर दोष दायित्व कालावधी ४ वर्षे आहे. भेगा पडलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम दोष दायित्व कालावधीमध्ये कंत्राटदार आय.आर.सी मानकाप्रमाणे स्वतःच्या खर्चाने करीत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील पिण्याच्या पाण्याचे तलाव,**
**तरण तलाव, खाडी, नाले प्रदूषित झाल्याबाबत**

**(७) * १०५७२ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत सुमारे ३५ तलावांच्या ठिकाणी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येऊनही पिण्याच्या पाण्यासह, तलाव, तरण तलाव, खाडी व नाले यांचे पाणी प्रदूषित झाल्याचे ठाणे महानगरपालिकेने जाहीर केलेल्या पर्यावरण अहवालात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध प्रकारचे उपाय केले जाऊनही पिण्यास अयोग्य असलेल्या पाण्याचे प्रमाण नऊ टक्के आढळले तर पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता ९१ ते ९२ टक्क्यांपर्यंत आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही वर्षात खाडीचे पाणी दुषित झाले असून रेतीबंदर, मुंब्रा, कळवा, साकेत, कशेळी, कोलशेत आणि गायमुख खाडीची गुणवत्ता घसरली जाऊन ऑक्सिजनचे प्रमाण अधिक आढळून अमोनिकल नायट्रोजनची पातळी वाढल्याचे अहवालात दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे महानगरपालिका हद्दीत प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेल्या तलाव, खाडी व नाले यांच्या ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.

(२) खरे नाही.

टेमघर जलशुद्धीकरण केंद्र, स्टेम डिस्ट्रीब्युशन ॲण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून घेण्यात येणारे पाण्याचे १००% पाणी नमुने योग्य आहेत. ठामपा शहरात WHO च्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता मानकांनुसार रहावी, यासाठी दररोज रहिवासी संकुले वहन व वितरण व्यवस्थेमध्ये तसेच नळ संयोजनामधून पाणी नमुने घेण्यात येतात व त्यानुसार पिण्यायोग्य पाणी पुरविणेबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येते.

(३) खरे नाही,

ठाणे खाडीमध्ये ठाणे, नवीमुंबई भागातील नाले खाडीत जाऊन मिळतात. ठाणे क्षेत्रामधील खाडीच्या पाण्यात विरघळलेला ऑक्सिजन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांप्रमाणे योग्य आहे.

(४) ठाणे शहरात ३७ तलाव असून सर्व तलावांची पाण्याची गुणवत्ता योग्य राखण्यासाठी नियमितपणे सर्व तलावांच्या ठिकाणी एरियेशन यंत्रणा उभारलेली आहे. तसेच,तलावांना नियमितपणे बायोप्रोडक्टचा डोस देण्यात येतो व सर्व तलावांची गुणवत्ता नियमितपणे तपासण्यात येते. तसेच,ठाणे महानगरपालिकेने ३१८ MLD चे STP यंत्रणा उभारलेली आहे. तसेच १८५ खाजगी संकुलांमध्ये STP यंत्रणा कार्यान्वित आहे. ठामपाच्या STP प्रकल्पातील प्रक्रिया करुन बाहेर सोडण्यात येणाऱ्या पाण्याची गुणवत्ता MPCB मानकांनुसार असल्याची खात्री ठामपाद्वारे करण्यात येते. ठाणे शहरात

एकूण ८३ नाले आहेत. काही नाल्यांच्या ठिकाणी खाडीत घनकचरा जाण्यापासून रोखण्याकरिता जाळया बसविण्यात आल्या आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील खाडी व नाले यांच्या ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याबाबत महानगरपालिका अमृत २ योजना, राज्य सरोवर सवंर्धन योजना तसेच STP उभारणीद्वारे कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांदरपाडा, दहिसर (पूर्व) मुंबई येथील एका तरुणाचा नायर रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झालेला मृत्यु

**(८) * ८१३५ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदरपाडा, दहिसर (पूर्व) येथील एका २६ वर्षीय तरुणावर उपचार सुरु असताना नायर रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे दिनांक २० एप्रिल, २०२५ रोजी मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी रुग्णांच्या नातेवाईकांनी आग्रीपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) बाई यमुनाबाई लक्ष्मण नायर धर्मादाय रुग्णालयामध्ये कांदरपाडा, दहिसर (पूर्व) येथील विशाल मगर या २६ वर्षीय तरुणाचा दि.२० एप्रिल, २०२५ रोजी मृत्यु झाला, हे खरे आहे. मृत तरुणाच्या वडीलांच्या तक्रारीवरुन डॉक्टरांच्या हलगर्जीपणाने मृत्यू झाल्याबाबत आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे दि.२०.०४.२०२५ रोजी अपमृत्यू नोंद क्र.२७/२५ बीएनएसएस कलम १९४ अन्वये नोंद घेण्यात आली आहे.

(३) याबाबत रुग्णालय स्तरावर उप अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली. चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर रुग्णाच्या उपचारादरम्यान कोणताही हलगर्जीपणा झाल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) कुळगाव येथील नगरपरिषद हद्दीतील महिलांना सक्षम व स्वावलंबी करण्याकरिता घरगंटी खरेदीकरिता प्रशासकिय मान्यता मिळण्याबाबत

**(९) * ९३५० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील महिलांना सक्षम व स्वावलंबी करण्याकरिता प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी २ कोटी ५० लाख ५३ हजार रुपयांच्या ८०० शिलाई मशीन व, ६९० घरघंटी खरेदी करिता प्रशासकीय मंजुरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री खनिजक्षेत्र कल्याण निधी वापरत असताना महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक डी एम एफ ०६२२/प्र क्र ५७ / उ -९ मंत्रालय मुंबई या शासन निर्णयातील अटी, शर्ती व नियम डावलले गेले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरचा निधी शासन निर्णयातील अटी व शर्ती व नियमांचे पालन न करता गैरमार्गाने व बेकायदेशीरपणे इतरत्र वर्ग करणाऱ्या संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील महिलांना प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या माध्यमातून शिलाई मशिन व घरघंटी वाटप करण्यासाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठान, ठाणे यांचे दिनांक २८/०२/२०२४ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यतेसह नगरपरिषदेस निधी वितरीत केला आहे.
(२), (३) व (४) महिला सक्षमीकरण व शाश्वत रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देश्याने महिलांना घरघंटी व शिलाई मशिन योजनेचा लाभ घेण्यासाठी नगरपरिषदेने स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देऊन इच्छूक महिलांकडून अर्ज मागविले. प्राप्त अर्जांच्या छाननीअंती पात्र अर्ज संख्या व लाभ द्यावयाच्या यंत्रांची संख्या व्यस्त प्रमाणात असल्याने संगणकीय सोडत पद्धतीने लाभार्थी निवड करणे विधीसंगत असल्याने व लाभार्थी महिलांच्या निवडीबाबत पारदर्शकता राखण्याच्या दृष्टिकोनातून मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. समितीने योजनेच्या मार्गदर्शक सूचना व निकषानुसार लाभार्थ्यांची निवड केली असून थेट लाभ हस्तांतरण (DBT) धोरणानुसार नगरपरिषदेकडून निधी वितरीत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### बीड जिल्ह्यात व्यापा-यांनी बनावट देयके दाखवुन कोट्यवधी रुपयांचा केलेला गैरव्यवहार

**(१०) * ८४०५ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात सन २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीमध्ये व्यापा-यांनी सुमारे २००० ते ३००० कोटी रुपयांची वस्तु वसेवा कराची (GST) बनावट देयके दाखवुन कोट्यवधी रूपयांची शासनाची फसवणुक केल्याच्या शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड जिल्हा GST कार्यालय व विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार केल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कराची वसुली करण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) याबाबत एक निनावी तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीत कुठल्याही व्यापाऱ्याचे नाव, पत्ता किंवा GST No. नमूद केलेला नसून तक्रार मोघम स्वरुपाची आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर तक्रार निनावी असली तरी या प्रकरणात संबंधित तक्रारीबाबत प्राथमिक चौकशी करून वस्तुस्थिती अहवाल शासनास तात्काळ सादर करावा अशा सूचना राज्यकर विभागास देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### पालघर जिल्ह्यात शहरी भागासह ग्रामीण भागात अशुद्ध पाण्याची विक्री होत असल्याबाबत

**(११) * ७२७८ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात शहरी भागासह ग्रामीण भागात सुद्धा मिनरल वॉटरच्या नावाखाली अशुद्ध पाणी विक्रीचे व्यवसाय सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाण्याच्या जार विक्री व्यवसायाकरिता एफडीआय व बीएसआय मार्कची कोणतीही परवानगी घेतली नसून पाणी शुद्धीकरण करण्याचेही बनावट शेकडो प्लान्ट शहरात व ग्रामीण भागात सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करण्यासह सदर उद्योगासाठी नियमावली तयार करण्याबाबत तसेच यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जार मधील पाणी हे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील कलम ३ (१) (j) नुसार अन्न पदार्थाच्या व्याख्येत/संज्ञेत येत नसल्यामुळे खुल्या स्वरुपातील अथवा जारमध्ये विक्री होत असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई करण्यात येत नाही.

तथापि, अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्या अंतर्गत नियम व नियमने, २०११ नुसार पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर करीता अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्टस ॲन्ड फूड ॲडिटिव्ह) नियमन, २०११ मधील नियमन २.१०.८ अन्वये मानके निश्चित करण्यात आलेली आहेत. सदर व्यवसायासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदयांतर्गत परवाना घेणे बंधनकारक असून अन्न व औषध प्रशासनाकडून पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे नमुने विश्लेषणासाठी नियमितपणे घेतले जातात. उल्लंघन आढळून आल्यास अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतूदीनुसार नियमोचित कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटकोपर ( मुंबई ) येथील मानखुर्द लिंक रोड उड्डाणपुलाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(१२) * ९१२७ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत रु.६५० कोटी खर्च करुन बांधण्यात आलेल्या घाटकोपर-मानखुर्द या सुमारे २.९ किमी लांबीच्या जोड रस्त्याच्या उड्डाणपुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून सदर रस्त्याला व सुरक्षा कठड्यांना मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपुलावरून अवजड वाहनांना प्रवेश बंदी असल्यामुळे इतर रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत असून नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उड्डाणपुलाच्या निकृष्ट कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी न्यू संगम वेल्फेअर संस्थेचे अध्यक्ष यांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उड्डाणपुलाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच यासंबंधित दोषीं असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) घाटकोपर मानखुर्द लिंक रोडवरील उड्डाणपुलाच्या देवनार कचरा क्षेपण भूमिकडील मार्गिकेच्या उतार भागाजवळ (Approach ramp) कचरा डेपो रस्त्यावर मलनिस्सारण प्रकल्प विभागाद्वारे भूमिगत गटाराचे (मायक्रो टनेलिंग) काम सुरु आहे. याकरिता खड्ड्यामधील पाण्याचा उपसा करताना उतार भागाच्या पायाच्या भिंतीखालील माती वाहून गेल्याने सदर भिंतीचे काही पॅनल व कठडा यांना तडे गेले आहेत. सदर उड्डाणपुलाची तांत्रिक तपासणी तांत्रिक सल्लागार व व्हीजेटीआयच्या तज्ज्ञांनी केली असून शिफारशीनुसार दुरुस्तीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(२) हे खरे नाही
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर उड्डाणपुलाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागार यांनी दिलेल्या डिझाईनप्रमाणे व प्रचलित विविध भौतिक मानके, मुंबई महानगरपालिकेतील विविध प्रचलित धोरणे व IRC मानकानुसार

पूर्ण करण्यात आले आहे. बांधकामात वापरण्यात येणाऱ्या सामग्रीचे चाचणी मान्यता प्राप्त प्रयोगशाळेत वेळोवेळी करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मे. मेघा इंजिनिअरींग ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीने परदेशी बँकेचे बनावट हमी पत्र देऊन एमएमआरडीए ची केलेली फसवणूक**

**(१३) * ७२४९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) मे. मेघा इंजिनिअरींग ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीने ठाणे ते बोरिवली दरम्यान करण्यात येणाऱ्या दुहेरी भुयारी बांधकामासाठी परदेशी बँकेचे बनावट हमी पत्र देऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची फसवणूक केल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार अशाप्रकारे बँकेची बनावट हमी देणाऱ्या कंपनीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) ठाणे ते बोरिवली दरम्यान दुहेरी भुयारी मार्गाचे बांधकाम करणे या प्रकल्पाकरीता मे. मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून करारातील अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराने आगाऊ रकमेसाठी युरो एक्झिम बँक (EEB) सेंट लुसिया येथील बँक हमी करारात दिलेल्या स्वरुपात सादर केली. त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया, सिकंदराबाद (SBI) यांचेकडून दि.२२.०८.२०२३ रोजी प्राधिकरणास सदरच्या बँक हमी संदर्भातील SWIFT संदेश (पॅकेज-१ व पॅकेज-२ साठीच्या बँक हमी संदर्भात) मिळाल्याची पुष्टी करणारे पत्र जारी केले आहे. तसेच दि २९.०८.२०२३ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र, कलानगर शाखेने सदरच्या बँक हमीची Structured Financial Messaging System (SFMS) या स्तरावर पुष्टी केली आहे. त्यास अनुसरुन प्राधिकरणाने कंत्राटदारास आगाऊ रक्कम अदा केली.

याबाबत, प्राधिकरणाद्वारे कायदेशीर सल्ला (Legal Opinion) मागविण्यात आला असता, मे. मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी सादर केलेल्या बँक हमी व तत्सम मुद्यांबाबत कायदेशीर सल्लागाराने असे अधोरेखित केले की, प्राधिकरणाने कंत्राटदाराकडून सादर करण्यात आलेल्या बँक हमी स्वीकारुन प्रकल्पाच्या कराराच्या कोणत्याही अटीं शर्तीचे उल्लंघन केलेले नाही.

-----------------

**बोंडखेडे (जि. छत्रपती संभाजीनगर) व इतर गावांमध्ये सेलेनियमयुक्त गहू सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम झाल्याबाबत**

**(१४) * ७३२३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील बोंडखेडे व इतर चार गावांमध्ये सेलेनियमयुक्त गहू सेवनामुळे नागरिकाच्या नखांची गळती,त्वचेवर चट्टे व केस गळण्याच्या घटना घडल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानवाला अपायकारक ठरणाऱ्या अशा गहू वितरणाकडे अन्न धान्य गोदाम व पुरवठा विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी अन्नधान्यांची नियमित नमुना तपासणी तसेच शेतकऱ्यांना सेंद्रिय खत व विषमुक्त बियाणांच्या संदर्भात जनजागृती मोहिम राबविण्याबात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधित नागरिकांची आरोग्याविषयक तपासणी करण्याबाबत तसेच यास जबाबदार असलेल्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव तालुक्यातील बोंडखेडे व इतर गावामधील नागरिकांमध्ये केस व नख गळतीची समस्या निर्माण झाल्याची बातमी एप्रिल महिन्यामध्ये प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाली आहे.
(२) हे खरे नाही. सदर आरोग्यविषयक समस्या कोणत्या घटकामुळे घडली आहे, याबाबत, ICMR वा अन्य कोणत्याही शासकिय संस्थेकडून निश्चित निष्कर्ष अहवाल प्राप्त झालेला नाही, असे अन्न व औषध प्रशासन यांच्यामार्फत कळविण्यात आले आहे.
(३) NFSA अंतर्गत उचल करण्यात येणाऱ्या अन्नधान्याची नमूना तपासणी करुन अन्नधान्याची उचल करण्यात यावी, असे निर्देश शासन स्तरावरुन सर्व जिल्ह्यांना देण्यात आलेले आहेत. तसेच, राज्यामधील शेतकऱ्यांमध्ये नैसर्गिक शेती बाबत जनजागृती करण्यासाठी परंपरागत कृषि विकास योजना, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन कृषि विभागामार्फत करण्यात येते.
(४) सदर केसगळतीची बाब निदर्शनास येताच बाधित नागरिकांची आरोग्य विभागाच्या विविध पथकांद्वारे आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कासा (ता.डहाणू,जि.पालघर) कार्यालयातंर्गत येणाऱ्या घोळ येथील भात गोदामाला लागलेल्या आगीबाबत

**(१५) * ८९३७ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कासा (ता.डहाणू,जि.पालघर) येथील आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यालयातंर्गत येणाऱ्या घोळ येथील भात गोदामाला दिनांक २५ मार्च,२०२५ रोजी वा त्यासुमारास भीषण आग लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गोदामातील शेतक-यांचा यावर्षी खरेदी केलेला जवळपास ३ हजार क्विंटलच्यावर भाताचे आगीमुळे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) सदर प्रकरणी आदिवासी विकास महामंडळामार्फत पोलीस स्टेशन कासा (ता.डहाणू, जि.पालघर) येथे अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आगीत शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही. शेतकऱ्यांकडुन खरेदी करण्यात आलेल्या धानाची संपुर्ण रक्कम ऑनलाईन पध्दतीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हातील आदिवासी विकास महामंडळाच्या अंतर्गत धान आणि बारदान खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१६) * ७११७ श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हातील आदिवासी विकास महामंडळाच्या कूरखेडा उपप्रादेशिक कार्यालयांतर्गत देऊळगाव येथील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी केंद्रावर सन २०२३-२४ मध्ये धान आणि बारदान खरेदीत दीड कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षात एकूण ३ कोटी ९५ लाख रुपयांचा गैरव्यवहार झालेला असून जिल्हाधिकारी यांनी दोन्ही वर्षातील गैरव्यवहार प्रकरणात गुन्हे नोंदवून संबंधितांच्या मालमत्तेवर बोजा चढवावा व त्या मालमत्तेचा लिलाव करुन त्यातून गैरव्यवहाराची रक्कम वसूल करण्याचे निर्देश सन २०२५ मध्ये दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,सन २०२४-२५ या कालावधीत देखील याच संस्थेत पुन्हा सव्वादोन कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देऊळगाव येथील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेव्दारे सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या कालावधीत केलेल्या धान खरेदीत दहा हजार क्विंटलची तफावत आढळून आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कुरखेडा उपप्रादेशिक कार्यालयातील अधिकारी चार वर्षापासून येथे कार्यरत असून राईस मिल धारकांकडून वरिष्ठांच्या नावावर कोट्यवधी रुपयांची वसुली करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्रादेशिक व्यवस्थापकांनी संबंधित केंद्राचे अध्यक्ष आणि अधिका-यांना नोटीस बजावली असून याप्रकरणी समितीने केलेल्या तपासणीत प्रथमदर्शनी गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले असल्याचे प्रादेशिक व्यवस्थापक यांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) हे अंशत: खरे आहे.

संबंधित उपप्रादेशिक व्यवस्थापक हे सुमारे ४ वर्षापासुन उप प्रादेशिक कार्यालय, कुरखेडा येथे कार्यरत होते. त्यांच्याविरुध्द वरिष्ठांच्या नावावर कोट्यवधी रुपयांची वसुली करत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त नाही.

(६) हे खरे आहे.

आदिवासी विकास महामंडळाने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित अधिकारी, संस्था सचिव व केंद्र प्रमुख यांनी गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांना प्रादेशिक व्यवस्थापक, गडचिरोली यांनी नोटीस बजावलेल्या आहेत.

(७) सदर प्रकरणी आदिवासी विकास महामंडळाने चौकशी केली असुन सदर प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित अधिकारी, संस्था सचिव, केंद्र प्रमुख तसेच संचालक मंडळावर पोलिस स्टेशन कुरखेडा येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागात अनुकंपा भरतीमध्ये तसेच सेवाज्येष्ठता यादीत झालेला गैरप्रकार

**(१७) * ७७४० श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागात बनावट आदेश तयार करून वरिष्ठ अभियंत्यांच्या स्वाक्षऱ्यांनिशी मसुदा तयार करण्यात येऊन ज्येष्ठता यादीत कर्मचाऱ्यांची नावे वरखाली करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश हे कट-पेस्ट व मॉर्फिंग बनावट करुन दिल्याची शक्यता असून यात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१३ पासून आजपर्यंत अनुकंपा भरती अंतर्गत ज्येष्ठता डावलून आदेश देण्यात आल्याच्या तक्रारी असून बनावट आदेश तयार करुन सेवाज्येष्ठता यादीत गैरप्रकार केल्याचे, तसेच जवळच्या नातेवाईकांच्या नियुक्त्यांचे आदेश काढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधित जबाबदार असलेल्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अंशत: खरे आहे. वर्ग-४ च्या अनुकंपा तत्वावरील ज्येष्ठता यादीत नांव समाविष्ट नसलेल्या कर्मचाऱ्यांना बनावटी नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

(२) होय

(३) अंशत: खरे आहे.

अनुकंपा ज्येष्ठता यादी व्यतिरिक्त व्यक्तींना बनावट नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

(४) सदर प्रकरणी ६ सदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने बनावट आदेशान्वये रुजू झालेल्या व्यक्तींना सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. संबंधित आस्थापना शाखेचे वरिष्ठ लिपिकास मंडळ स्तरावरुन निलंबित केले असून, त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माझगांव (मुंबई) येथील वस्तु व सेवा कर कार्यालयातील विक्रीकर अधिकाऱ्यांने केलेला आर्थिक गैरव्यवहार

**(१८) * ८२५४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव (मुंबई) मधील वस्तु व सेवा कर विभागातील विक्रीकर अधिकारी श्री. गजानन लाड यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे इंटरक्राइब मार्केट प्रा.लि.कंपनी स्थापन करुन पदाचा दुरुपयोग करुन कोणताही कर न भरता सुमारे ४ कोटी ६९ लाख रुपयाचा परतावा घेऊन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात कोणताही व्यवहार न करता परतावा मंजूर करुन शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदरहु विक्रीकर अधिकारी श्री. गजानन लाड यांचेवर गुन्हा दाखल केल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाच्या आर्थिक नुकसानीची वसुली करणे, संबंधित अधिकारी यांची मालमत्ता जप्त करणे, त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यासह त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार :** (१) अंशत: खरे आहे. श्री.गजानन लाड, राज्यकर अधिकारी (से.नि.) यांनी इंटरक्रिब मार्केट प्रा.लि. ही कंपनी स्थापन केली असल्याचे कोणतेही पुरावे वस्तू व सेवाकर विभागाकडे नाहीत. GSTN नुसार सदर कंपनीचे श्री.अब्दुल अहाद मुहम्मद घौस मुजावर हे संचालक आहेत. श्री.गजानन लाड, राज्यकर अधिकारी (से.नि.) यांनी पदाचा दुरुपयोग करून सुमारे ४ कोटी ६९ लाख रुपयाचा ना-देय परतावा प्रदान केला आहे.

(२) श्री.गजानन लाड, राज्यकर अधिकारी यांनी सदर ना देय परतावा प्रदान केल्याने शासनाचे ४.६९ कोटीचे आर्थिक नुकसान झाले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) श्री.गजानन लाड, राज्यकर अधिकारी (से.नि.) यांना शासन आदेश दि.०१.०६.२०२३ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे, तद्नंतर श्री.गजानन लाड, राज्यकर अधिकारी (से.नि.) हे दि.३१.०८.२०२३ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत.वस्तू व सेवाकर विभागाच्या दि.०६.०९.२०२३ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री.गजानन लाड, राज्यकर अधिकारी (से.नि.) यांच्याविरुद्ध गुन्हा र.क्र. १६/२०२५ दि.१५.०४.२०२५ रोजी दाखल करण्यात आला असून पुढील तपास संबंधित पोलिस यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे. त्याशिवाय सदर अधिकाऱ्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहा (जि.रायगड) तालुक्यातील सरकारी गोदामातील धान्य माथाडी कामगारांच्या संपामुळे खराब झाल्याबाबत

**(१९) * ८१६७ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील २१ शासकीय धान्य गोदांमामध्ये सात हमाल संस्थांना शासनाने कंत्राट दिले असून या कंत्राटांची मुदत सन २०२२ मध्ये संपली असतांनाही हमाल संस्थांना वेळोवेळी तात्पुरती मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहा येथील हमालांनी प्रलंबित हमाली देयके,माथाडी मंडळाने निश्चित केलेल्या सुधारित दरांची (खंड ३३ अंतर्गत) अंमलबजावणी करणे, मुदतवाढीऐवजी नव्याने निश्चित प्रक्रिया करणे आदि मागण्यांसाठी दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पासून कामबंद आंदोलन पुकारले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माथाडी कामगारांच्या संपामुळे महिनाभरापासून गोदामात पडलेले सुमारे ६०० टन धान्य खराब झाले असल्याचे दिनांक २५ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) धान्य खराब झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील गार नदीवरील पुलाचे नूतनीकरण करण्याबाबत

**(२०) * ७३९१ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोडाळा-विहिगाव (ता.मोखाडा, जि.पालघर) मार्गावारील साखळी क्र २७/१५० दरम्यान असलेल्या गार नदीवरील ब्रिटिश कालीन अरुंद पुलाची दुरवस्था झाली असून एका वेळेस एकच वाहन जाऊ शकत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर जिल्हयातील अनेक नदी ओढयांवरील पुलांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,ब्रिटीश कालीन पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट न करता त्यांचे नुतनीकरण करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर पुलाची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) सदर पुलाची रुंदी ४.८५ मी असल्याने एका वेळी एकच वाहन जाणे शक्य आहे. सद्यस्थितीत सदर पुल वाहतुकीकरीता सुस्थितीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. पुलांची संरचनात्मक दुरुस्तीची कामे आवश्यक संरचनात्मक परिरक्षण करुन केली जातात.

(४) निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार सदर जागी IRC च्या मानकाप्रमाणे नवीन पुलाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेत कोरोना काळात खिचडी वाटपात झालेला गैरव्यवहार

**(२१) * ९१६३ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतर्फे कोरोना काळात माहे एप्रिल, २०२० ते जुलै, २०२२ मध्ये वाटप करण्यात आलेल्या खिचडी पाकीट वाटपामध्ये रु.१४ कोटी ५७ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे पोलिसांच्या तपासात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. वैष्णवी किचन, सह्याद्री रिफरेशमेन्ट व फोर्स वन मल्टी सर्व्हिसेस यांनी स्नेहा कॅटरर्सकडून खिचडी बनवून पाकिटे वाटप करण्यात आले असून पात्रता निकषात बसत नसतानाही या कंपन्यांना कंत्राट देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३०० ग्रॅमची पाकिटे द्यावयाची असतानाही १००- २०० ग्रॅम वजनाची खिचडीची पाकिटे तयार करुन ती साधारणत: २२ ते २४ रुपये अशा वेगवेगळया दराने खरेदी करुन महानगरपालिकेकडून मात्र प्रति पाकीट ३३ रुपये घेऊन गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्यासह शासकीय निधीचा अपहार रोखण्यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर बाबतीत आर्थिक गुन्हे विभागामार्फत चौकशीची कार्यवाही सुरू आहे. त्याबाबतचा अहवाल अदयापपर्यंत महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.
(२) कोविड-१९ या साथीच्या रोगामुळे आपत्कालीन परिस्थिती पाहता निविदा प्रक्रीया करण्यात आली नव्हती. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) यांच्या अध्येक्षतेखाली समिती गठीत करून कम्युनिटी किचन अंतर्गत शिजवलेल्या अन्नाचा पुरवठा करणा-या इच्छुक संस्थांसोबत चर्चा करून प्रति ३०० ग्रॅम तयार खिचडी, पुलाव व बिर्याणी प्रति पॅकेट दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार सह्याद्री रिफरेशमेंन्ट (वैष्णवी किचन) व फोर्स वन मल्टी सर्व्हिसेस यांना तयार अन्नाच्या प्रति पाकीटाकरिता रु.३३/- अधिक वस्तु व सेवाकर या दराने कार्यादेश देण्यात आले होते.
(३) व (४) सदर बाबत आर्थिक गुन्हे विभागामार्फत चौकशीची कार्यवाही सुरू असुन त्याबाबतचा अहवाल अदयापपर्यंत महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना शहरात भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात एका मुलीचा झालेला मृत्यु

**(२२) * ७१८२ श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना शहरात भटक्या कुत्र्याने केलेल्या हल्ल्यात सात वर्षीय मुलीचा दुर्देवी मृत्यू झाल्याचे दिनांक ६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात अनेक जण गंभीर जखमी झाले असून कित्येकांनी आपले प्राण गमावल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यातील मृत व जखमींना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच भटक्या कुत्र्यांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे,
जालना शहरातील गांधीनगर परिसरात दि.०६ मे, २०२५ रोजी भटक्या कुत्र्याने केलेल्या हल्ल्यात कु.संध्या प्रभुदास पाटोळे, वय ७ वर्षे या मुलीचा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.
(२) हे खरे आहे,
राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दि.०१ एप्रिल, २०२४ ते दि.३१ मार्च, २०२५ या कालावधीमध्ये कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या ३,२४,८१५ इतक्या घडलेल्या घटनेमध्ये गंभीर जखमी झालेल्या व्यक्तींची संख्या ८,९०३ इतकी आहे. तसेच नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रांमध्ये ४ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, मार्च, २०२५ नंतर महानगरपालिका क्षेत्रांमध्ये ३ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.
(३) राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातून नागरिकांकरीता श्वानदंशावरील लस मोफत देण्याबाबत दि.०५.११.२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
त्याचप्रमाणे राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतींमध्ये “प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३” ची अंमलबजावणी करण्याबाबत नगर विकास विभागामार्फत दि.२०.०३.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) शहरात कचरा वाहतुकीसाठी वापरली जाणारी वाहने जुनी व मुदतबाह्य असल्याबाबत

**(२३) * ७३९२ श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) शहरात कचरा वाहतुकीसाठी महानगरपालिकेची वापरली जाणारी वाहने अतिशय जुनी तसेच मुदतबाह्य असल्याने मोडकळीस आली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई शहरातून दररोज सुमारे ८०० मॅट्रिक् टन कचरा संकलन करण्यासाठी पालिकेने ६३ कॉम्पॅक्टर १०८ टिपर आणि ५७ खाजगी वाहने मुदतबाह्य व अतिशय जुनी झाली आहेत तसेच काही वाहनांची दूरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाहने परिवहन विभागाकडून आवश्यक असलेली सुरक्षा तपासणी (फिटनेस) न करताच चालवली जात असल्याने त्यातून निघणाऱ्या काळ्या धुरामुळे वायू प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कचरा वाहतुकीसाठी वापरली जाणारी जुनी वाहने निष्कासित करून या वाहनच्या वापरास परवानगी देणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली तसेच जुनी वाहने बदलून नविन वाहने आणण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात कचरा संकलनाकरिता ६५ कॉम्पॅक्टर, ११८ टिपर हे महानगरपालिकेच्या मालकीचे आहे. त्यापैकी सद्यस्थितीत ४३ कॉम्पॅक्टर, ६९ टिपर या वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र वैध असून वैधता प्रमाणपत्र प्राप्त वाहने घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यन्वित आहेत. आवश्यकतेनुसार घनकचरा व्यवस्थापनाकरिता खाजगी वाहने महानगरपालिकेमार्फत घेण्यात येतात व त्याद्वारे शहरातील स्वच्छता राखली जाते.

(४) घनकचरा व्यवस्थापन विभागात वापरात असलेली जी वाहने जुनी व मुदतबाह्य होतात अशी वाहने वापरात न ठेवता निर्लेखिंत केली जातात. सन २०२४ या वर्षात घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १७ कॉम्पॅक्टर मुदत बाह्य झाल्यामुळे वाहन विभागातर्फे सदर वाहनांच्या निर्लेखनाची प्रक्रिया सुरु आहे. तसेच १० टिपर वाहने वापरात आणली जात नसून त्यांच्याबाबतही निर्लेखनाची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, १५ वा वित्त आयोगातून १७ कॉम्पॅक्टर खरेदी करण्यात आले असून नवीन २० टिपर खरेदी करण्याची प्रक्रिया करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (मुंबई) येथील मे.अर्बनकेयर लाईफ साइन्सेस एल.एल.पी. या औषध विक्रेत्याकडून अवैध औषध साठा जप्त केल्याबाबत

**(२४) * ७२१९ श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथील मे.अर्बन केयर लाईफ साइन्सेस एल.एल.पी. या घाऊक औषध विक्रेत्याकडून जवळपास ६१ लाख रुपयांचा अवैध औषध साठा जप्त केल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विक्रेत्याने औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५ च्या तरतुदींचा भंग केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) माहे एप्रिल, २०२५ मध्ये कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जप्त करण्यात आलेल्या औषध साठ्यांचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आलेले असून त्याचा तपासणी अहवाल शासनाकडे प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीं विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मे. अर्बनकेअर लाईफसायन्सेस एल. एल. पी., घाटकोपर या विक्रेत्यांकडून दि.०१/०६/२०२५ रोजी सुमारे ६३,९५,८७१.७५/- रुपये (अक्षरी-त्रेसष्ट लाख पंच्याण्णो हजार आठशे एकाहत्तर रुपये व पंच्याहत्तर पैसे) एवढ्या किंमतीचा औषध साठा जप्त करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर पेढीतून विश्लेषणासाठी औषध नमूने घेण्यात आले असून सदर औषध नमूने हे शासकीय विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रशोगशाळा, मुंबई यांच्याकडे विश्लेषणार्थ पाठविण्यात आले आहेत. सदर औषध नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधिताविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० मधील तरतुदीनुसार न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.